G.H.Raisoni Institute of Engineering & Management,Jalgaon

लोकमत Date 3 December 2016

# रामदेववाडी येथे मार्गदर्शन

जळगाव : प्रवास करताना नियमांचे पालन खूपच गरजेचे असून वाहन चालविताना सजगता बाळगणे महत्त्वाचे आहे, असे मत शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांनी व्यक्त केले.

जी.एच.रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयांतर्गत रामदेववाडी येथे 'रस्त्याचा सुरक्षित प्रवास' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. सहायक उप निरीक्षक सतीश जोशी, उपप्राचार्य प्रा.हरीश भंगाळे समन्वयक प्रा.सी.व्ही. पाटील, ग्रामस्थ उपस्थित होते. जनसंपर्क अधिकारी अमोल बाविस्कर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

Engineering Management Law Schools Other Courses
RAISONI GROUP OF INSTITUTIONS
NAGPUR AMRAVATI AHMEDNAGAR PUNE JALGAON RAIPUR

G.H.Raisoni Institute of Engineering & Management,Jalgaon

पुण्य नगरी Date 3 December 2016

# प्रवास करताना सजगता बाळगा - एपीआय प्रदीप देशमुख



जळगाव : प्रवास जीवनाचा असो किंवा वाहनासोबतचा त्यात काळजी घेणे महत्वाचे आहे. आज आपल्या अवतीभवती दोन दिवसाआड अपघात झाल्याचे कानावर पडते. अपघात कशामुळे घडतात याचा शोध घेणे प्रशासन तसेच नागरिकांचेही काम आहे. रस्त्याने प्रवास करताना पूर्णच नियमांचे पालन खूपच गरजेचे आहे असेही नाही; परंतु तुमच्या जीवाला संरक्षण पुरवतील अशा नियमांचे पालन करणे बंधनकारक राहते. वाहन चालविताना सजगता बाळगणे महत्वाचे आहे, असे मत शहर वाहतूक शाखेचे एपीआय प्रदीप देशमुख यांनी व्यक्त केले.

जी.एच.रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयांतर्गत संस्थेची सामाजिक जबाबदारी (सीएसआर) या कार्यक्रमाच्या माध्यमातून रामदेववाडी येथे 'रस्त्याचा सुरक्षीत प्रवास' या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रसंगी सहाय्यक उप निरीक्षक सतीश जोशी, उप-प्राचार्य प्रा.हरिश भंगाळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. सी.व्ही.पाटील व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले, समाजात स्थानिक पातळीचा अभ्यास करता रस्त्यावर प्रवास करताना अनेक नियमांची माहिती नागरिकांना नसते. त्यामुळे नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होत असते. शहरी भागापासून ते ग्रामीण स्तरापर्यंत जनजागृती करणे महत्वाचे आहे. तसेच उपनिरीक्षक जोशी यांनी नियमावलीचे हस्तपत्रके देऊन नियम व प्रवास चिन्हे याविषयीची माहिती सविस्तरपणे समजावून सांगितली. रस्त्यातील भाग, सिग्नलचे प्रकार, सिग्नल किती सेकंदात संपतो अशी प्राथमिक माहिती यावेळी त्यांनी दिली. महाविद्यालयाने रामदेववाडी हे गाव दत्तक घेतले आहे. गावातील विविध समस्या सोडविणे, जनजागृतीपर कार्यक्रम घेणे यासाठी महाविद्यालयाचा नेहमी प्रयत्न असतो. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रस्ता सुरक्षिततेची प्राथमिक माहिती नागरिकांना देण्यात आली. यापुढेही अशा कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येईल, असे मत उपप्राचार्य यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून व्यक्त केले. प्रसंगी सूत्रसंचालन व आभार जनसंपर्क अधिकारी अमोल बाविस्कर यांनी मानले.

RAISONI GROUP
a vision beyond

G.H.Raisoni Institute of Engineering & Management,Jalgaon

शहर TODAY

Date 4 December 2016

# प्रवास करताना सजगता बाळगा : प्रदीप देशमुख

## रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे व्याख्यान

**जळगाव, ता. ३ :** प्रवास जीवनाचा असो की वाहनासोबतचा त्यात काळजी घेणे महत्त्वाचेच आहे. आज आपल्या अवतीभवती दोन दिवसांआड अपघात झाल्याचे कानावर पडते. मात्र, अपघात कशामुळे घडतात, याचा शोध घेणे प्रशासन तसेच नागरिकांचेही काम आहे. रस्त्याने प्रवास करताना पूर्णपणे नियमांचे पालन करणे खूपच गरजेचे आहे, असेही नाही. परंतु तुमच्या जीवाला संरक्षण पुरवतील अशा नियमांचे पालन करणे बंधनकारक असते. वाहन चालविताना सजगता बाळगणे महत्त्वाचेच आहे, असे मत शहर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक प्रदीप देशमुख यांनी व्यक्त केले.

येथील रायसोनी अभियांत्रिकी महाविद्यालयांतर्गत संस्थेची सामाजिक जबाबदारी (सीएसआर) या कार्यक्रमाच्या माध्यमातून रामदेववाडी येथे 'रस्त्यावरील सुरक्षित प्रवास' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. याप्रसंगी सहाय्यक उपनिरीक्षक सतीश जोशी, उपप्राचार्य प्रा. हरीश भंगाळे, कार्यक्रम समन्वयक प्रा. सी. व्ही. पाटील व बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

श्री. देशमुख म्हणाले, की समाजात स्थानिक पातळीवर अभ्यास करतेवेळी रस्त्यावर प्रवास करताना अनेक नियमांची माहिती नागरिकांना नसते. त्यामुळे नियमांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होते. यानंतर उपनिरीक्षक जोशी यांनी नियमावलीची हस्तपत्रके देऊन नियम व प्रवास चिन्हे याविषयीची माहिती सविस्तरपणे समजावून सांगितली. महाविद्यालयाने रामदेववाडी हे गाव दत्तक घेतले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रस्त्यावरील सुरक्षिततेची प्राथमिक माहिती नागरिकांना देण्यात आली. जनसंपर्क अधिकारी अमोल वाविस्कर यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.